# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १)लोकसेवक श्री.कासम पिरु गवळी, तत्कालीन नगराध्यक्ष, नगर परिषद, मेहकर,<br>२)लोकसेवक श्री.तानाजी बापु घोलप, तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर,<br>३)लोकसेवक श्री.पवन भादुपोता, तत्कालीन मुख्य लिपीक, नगर परिषद, मेहकर,<br>४)श्री.शंकरलाल हसमुख काबरा, रा.साईकृपा अपार्टमेंट, शास्त्रीनगर, अकोला; संचालक, यश कंस्ट्रक्शन कंपनी, अकोला<br>५)श्री.सलीम इमाम गवळी, रा.गवळीपुरा, रिसोड रोड, शिरपुर जैन, ता.मालेगांव जि. वाशिम; संचालक यश कंस्ट्रक्शन कंपनी, अकोला<br>६) श्री.मनिष सुभाषचंद्र लढ्ढा, रा.अमृत हाऊसिंग सोसायटी, सातव चौक, जठारपेठ, अकोला; संचालक, यश कंस्ट्रक्शन कंपनी, अकोला<br>७)श्री.उदय बालकिसन सोनी, रा.रामनगर, मेहकर; संचालक, यश कंस्ट्रक्शन कंपनी, अकोला<br>८) श्री.अशोक शंकरलाल हेडा, रा.गुरुवार बाजार, शिव चौक, वाशिम; संचालक, यश कंस्ट्रक्शन कंपनी, अकोला. |
| निष्पन्न आरोप | गुन्हेगारी स्वरुपाचा कट व लोकसेवकांचे गुन्हेगारी स्वरुपाचे गैरवर्तन |
| घटनास्थळ | नगर परिषद, मेहकर मालकीची जागा गट क्रमांक ३० |
| घटना तारीख | दिनाक ३१/०३/२०१२ते ०१/०८/२०१५ |
| उघड चौकशी अधिकारी | श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. बुलडाणा |
| तपास अधिकारी | श्री. सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. बुलडाणा |

**थोडक्यात हकीकत :—**

सदर प्रकरणातील मुळ अर्जदार श्री. अहमद शहा सबदर शहा, रा. वार्ड क्र. ९ रेहमत नगर, मेहकर, जि. बुलडाणा यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा येथे दिलेल्या तक्रार अर्जामध्ये, शासनाची परवानगी नसतांना नगराध्यक्ष, नगर परिषद, मेहकर जि. बुलडाणा व यश कंस्ट्रक्शन कंपनीने संगनमत करुन नगर परिषदेच्या मालकीच्या जागेवर अवैध बांधकाम करुन केलेल्या भ्रष्टाचारासंबंधाने व अन्य तक्रारी करण्यात आल्या होत्या. सदर तक्रार अर्जा संबंधाने उघड चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयाकडुन प्राप्त झाले होते.

प्राप्त आदेशानुसार तक्रार अर्जातील आक्षेपांची सखोल चौकशी केली असता असे निष्पन्न होते की, लोकसेवक श्री कासम पिरु गवळी, तत्कालीन नगराध्यक्ष, नगर परिषद, मेहकर व लोकसेवक श्री तानाजी बापू घोलप, तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर यांनी आपले पदावर कार्यरत असतांना, पदाच्या नात्याने त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या मेहकर नगर परिषदेच्या मालकीच्या गट क्रमांक ३० मधील ०.३३ हेक्टर जागेवर बांधा, वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर दुकान संकुलाचे बांधकाम करण्यासाठी यश कन्स्ट्रक्शन कंपनीसोबत गुन्हेगारी स्वरुपाचा कट रचून; महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ४९(क) व कलम ९२ तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे परीपत्रक दिनांक

Scanned with CamScanner

०९/०६/२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन करुन व अधिकाराचा गैरवापर करुन सदर बांधकामासंबंधाने निवीदा प्रक्रिया पार पाडली.निवीदा सूचनेत अप्रामाणिकपणे मागील वर्षाच्या बाजारमूल्यावर आधारीत व अनुज्ञेय असलेल्या १.५ चटई क्षेत्र निर्देशांकाऐवजी १ चटई क्षेत्र निर्देशांक ग्राहय धरुन प्रिमीयम रक्कम निश्चीत केली व त्याद्वारे नगर परिषदेचे आर्थीक नुकसान करुन कंत्राटदारांना स्वस्तात जमीन उपलब्ध करुन देण्यात आली. मर्जीतील कंत्राटदारांना टेंडर देता यावे या उद्देशाने निवीदा सुचनेत निवीदाधारकांसाठी बांधकामाचा पुर्वानुभव, आर्थिक क्षमता इत्यादी बाबत अहर्ता तपासणी जाणीव पुर्वक टाळण्यात आली. निवीदा सूचना प्रसिध्दी नंतर दिनांक २४.०९.२०१२ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष श्री कासम गवळी यांचा भाचा श्री सलीम गवळी व त्यांच्या ४ सहका—यांनी यश कंस्ट्रक्शन कंपनी, अकोला या नावाने करारनाम्याव्दारे पार्टनरशिप फर्मची स्थापना करून निवीदा प्रक्रीयेत भाग घेतला व दिनांक २८.०९.२०१२ रोजी सदर कंपनीला दुकान संकुल बांधकामाचे टेंडर देण्यात आले.

दिनांक २८.०९.२०१२ रोजीच नगरपरिषद मेहकर व यश कंस्ट्रक्शन कंपनी यांच्या मध्ये बी.ओ.टी. तत्वावरील दुकान संकुल बांधकामा संबंधाने करारनामा करण्यात येवुन त्यामध्ये नगर परिषदेच्या आर्थिक हिताकडे दुर्लक्ष करुन कंपनीस अधिकाधिक लाभ व्हावा या अप्रामाणीक हेतुने गाळेवाटप व भाडेपट्टयासंबंधाने तरतुदी करण्यात आल्या. शासनाची पुर्वपरवानगी मिळणेपुर्वीच दिनांक २२.०४.२०१३ रोजी यश कंस्ट्रक्शन कंपनीस बांधकामासाठी कार्यादेश दिला व त्याद्वारे नगर परिषदेच्या मालकीच्या मालमत्तेवर यश कन्स्ट्रक्शन कंपनीस दुकान संकुलाचे बांधकाम करण्यास मुभा देवून सदर कंपनीस व पर्यायाने स्वत:स आर्थिक लाभ पाहोचविण्याची व्यवस्था केली.

तसेच श्री पवन भादुपोता, तत्कालीन मुख्य लिपीक यांनी यश कन्स्ट्रक्शन कंपनीसोबत गुन्हेगारी स्वरुपाचा कट रचून, महाराष्ट्र मुद्रांक कायदा कलम ५२ब(ब) व भारतीय नोंदणी कायदा—१९०८ कलम १७ मधील तरतुदींचे उल्लंघन करुन, अप्रामाणिकपणे गाळेधारकांसोबत बेकायदेशीर करारनामे करुन व त्याद्वारे मुद्रांक व नोंदणी शुल्काच्या स्वरूपात शासनास मिळणारा महसुल बुडवुन शासनाचे नुकसान केले तसेच करारनाम्यामध्ये निश्चीत करण्यात आलेल्या प्रती स्क्वेअर फुट दरापेक्षा एक रुपया कमी दराने भाडेपटटा करारनामे करून दरमहा रु १७६५०/— याप्रमाणे नगरपालीकेचे आर्थिक नुकसान केले.गाळे वाटप करतांना नगराध्यक्ष श्री कासम गवळी व श्री सलीम गवळी यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावाने बॅक खाते उघडून व त्यामधे रोखीने रक्कमा जमा करुन, त्या यश कन्स्ट्रक्शन कंपनीच्या खात्यात वळवून नातेवाईकांच्या नावे एकूण ४५ गाळयांचे करारनामे करण्यात आले आहेत. सदर गाळे भाडयाने देऊन मिळणारे उत्पन्न श्री सलीम गवळी व श्री कासम गवळी घेत असल्याबाबत चौकशीत निष्पन्न झाले आहे.

यश कन्स्ट्रक्शन कंपनीचे संचालक श्री शंकरलाल काब्रा, श्री मनिष लढढा, श्री अशोक हेडा, श्री उदय सोनी व श्री सलीम गवळी यांनी मेहकर नगर परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष श्री कासम गवळी, मुख्याधिकारी श्री तानाजी घोलप व मुख्य लिपीक श्री पवन भादुपोता यांचेसोबत गुन्हेगारी स्वरुपाचा कट रचून, बेकायदेशीर मार्गाने मेहकर नगर परिषदेची मालमत्ता स्वत:चे उपयोगात

Scanned with CamScanner

आणली व त्याद्वारे मेहकर नगर परिषद व शासनाचे आर्थिक नुकसान करुन स्वत:चा आर्थिक लाभ करुन घेतला.

नमूद लोकसेवक व यश कन्स्ट्रक्शन कंपनीच्या संचालकांचे सदर कृत्य हे अपराध असुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम—१९८८ कलम १३(२) सहकलम १३(१)(क)(ड) व भारतीय दंड संहिता कलम १२० (ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परीक्षेत्र, अमरावती, मा. श्री. अरुण सावंत, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती, परीक्षेत्र अमरावती व मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती तसेच श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा हे करीत आहेत.

( संजय चौधरी )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा
सत्यमेव जयते

Scanned with CamScanner